राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत बादशहाखान नेत्र रुग्णालय, मांडवी येथील ३ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : अंनिका-२०१७/अपदे/प्र.क्र. ३० /आरोग्य-५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,

संकुल इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

तारीख: ०२ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१ दि.०६/०८/२००७.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दि.०३/१०/२०१७.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनिका-२०१७/अपदे /प्र.क्र.३३६/आ-५ दि.०१/०६/२०१२.

४) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/अंनिका/३ अ.पदे/टे-१/कक्ष-८अ/१३१७/१७, दि.१३/१२/२०१७.

५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आपुक, दि.०८/०१/२०१८

प्रस्तावना :-

राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत बादशहा खान नेत्र रुग्णालय, मांडवी, जि.नांदेड येथील १९ अस्थायी पदांना सुधारीत आकृतीबंधानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दिनांक ६ ऑगस्ट, २००७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी १६ अस्थायी पदे सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अंनिका/अपदे २०१२/प्र.क्र.१९१/आरोग्य-५, दिनांक १ जून, २०१२ अन्वये स्थायी (कायम) करण्यात आली आहेत. उर्वरित ३ अस्थायी पदे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र. अंनिका-२०१७/अपदे/प्र.क्र.३३६/आरोग्य-५, दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये दिनांक ०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सदर मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात आली असल्याने, सदरहू पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत बादशहा खान नेत्र रुग्णालय, मांडवी, जि. नांदेड येथील अधिपरिचारिका-१ पद (वर्ग-३), कक्ष सेवक-१ पद (वर्ग-४), सफाईगार-१ पद (वर्ग-४) ही ३ अस्थायी पदे राज्यातील जनतेला आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने, सदर ३ अस्थाई पदे दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनिर्मितीच्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतनश्रेणी (रुपये)
१	अंनिका/२०१२/प्र.क्र.११९/ आ-६, दि.१४/०८/१९९२.	अधिपरिचारिका वर्ग-३	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
२	--"--	कक्ष सेवक वर्ग-४	१	४४४०-७४४० ग्रेड पे १३००
३	--"--	सफाईगार वर्ग-४	१	४४४०-७४४० ग्रेड पे १३००
		एकूण	**३**	

३. या पदांवरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्र. आर-१
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१-नागरी आरोग्य सेवा विषय चिकित्सा,
११०-रुग्णालये व दवाखाने
११० (०२) मुफसल रुग्णालय व दवाखाने
(०१)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने
(२२१० ०१४६) (अंधत्व नियंत्रण)

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि. ८ जानेवारी, २०१ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०२१५१३४१४९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2018.02.02 15:17:08 +05'30'

(संजय मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग-नेत्र), मुंबई.
४) सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे
५) उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर/औरंगाबाद.
६) जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड.
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
९) लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
११) वित्त विभाग, व्यय-१३, अर्थसंकल्प-३, अर्थसकल्प-९, मंत्रालय, मुंबई.
१२) सार्वजनिक आरोग्य विभाग, अर्थसंकल्प शाखा, सेवा-१, सेवा-५, मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती (आरोग्य-५).